

# शेजारती

(रात्रीं १० बाजता)

## १ – पांचाही तत्वांची आरती

ओवळू आरती माझ्या सद्‌गुरुनाथा, माझ्या साईनाथा।। पांचाही तत्वांचा दीप लाविला आता।। निर्गुणाची स्थिति कैसी आकारा आली, बाबा आकारा आली। सर्वा घटी भरूनि उरली साई माउली।। १ ।। ओवाळू॰... घृ. ।। रज तम सत्त्व तिघे माया प्रसवली, माझ्यावर माया प्रसवली। मायेचिये पोटीं कैसी मायाउद्‌भवली।। २ ।। ओंवाळू॰... घृ .।। सप्तसागरीं कैसा खेल मांडीला, बाबा खेल मांडीला।। खेळूनियां खेळ अवघा विस्तार केला।। ओवाळू॰ ..घृ ।। ब्रह्मांडीची रचना कैसी दाखविली डोळा, बाबा दाखविली डोळा।। तुका म्हणे माझा स्वामी कृपाळू भोळा।। सद्‌गुरु (साई सदगुरु) भोळा।। ओवाळू॰... घृ ।।

## २ –आरती ज्ञानरायाची

आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा। सेविती साधुसंत। मनु वेधला माझा।। आरती ज्ञानराजा ।। घृ॰।। लोपले ज्ञान जगी। हित नेणती कोणी। अवतार पांडुरंग। नाम ठेविले ज्ञानी।।१ ।। आरती ज्ञानराजा ।। घृ॰।। कनकाचे ताट करी। उभ्या गोपिका नारी । नारद तुंबर हो। सामगायन करी।।२ ।। ।। आरती ज्ञानराजा ।। घृ॰।। प्रगट गुह्य बोले। विश्‍व ब्रह्मचि केले। राम जनार्दनी। पायी मस्तक ठेविले।।३ ।।आरती ज्ञानराजा ।। घृ॰।।

## ३ – आरती तुकारामाची

आरती तुकारामा। स्वामी सद्‌गुरुधामा। सच्चिदानंद मूर्ती। पाय दाखवी आम्हां।। आरती तुकारामा।। घृ॰।। राघवे सागरात। जैसे पाषाण तारिले। तैसे हे तुकोबाचे। अभंग रक्षिले।।१ ।। घृ॰।। तुकिता तुलनेसी। ब्रह्म तुकासी आले। म्हणोनी रामेश्वरे। चरणी मस्तक ठेविले।।२ ।। घृ॰।।

## ४ – जय जय साईनाथ

जय जय साईनाथ आता पहुडावे मंदिरी हो। (x2 )। आळवितो सप्रेमे तुजला आरती घेउनि करी हो।। जय जय साईनाथ आता प्रभुडावे मंदिरी हो।। घृ॰।। रंजविसी तू मधुर बोलुनी माय जशी निज मुला हो। (x2 ) भोगिसि व्याधी तूच हरूनिया निजसेवकदु:खाला हो। (x2 ) धावुनि भक्तव्यसन हरिसी दर्शन देसी त्याला हो। (x2 ) झाले असतिल कष्ट अतीशय तुमचे या देहाला हो।। १ ।। जय॰।। घृ।। क्षमा शयन सुंदर ही शोभा सुमनशेज त्यावरी हो। (x2 ) ध्यावी थोडी भक्तजनांची पूजनादि चाकरी हो। (x2 ) ओवाळीतो पंचप्राण, ज्योति सुमती करी हो।। (x2 ) सेवा किंकर भक्त प्रीती अत्तर परिमळ वारी हो।। २ ।। जय॰।। घृ।। सोडुनि जाया दु:ख वाटते साई त्वच्चरणांसी हो। (x2 ) आज्ञेस्तव तव आशीप्रसाद घेउनि निजसदनासी हो। (x2 ) जातो आता येऊ पुनरपि त्वच्चरणाचे पाशी हो। (x2 ) उठवू तुजला साईमाउले निजहित साधायासी हो।। ३ ।। जय॰।। घृ।।

## ५ – आता स्वामी सुखे

आता स्वामी सुखे निद्रा करा अवधूता। बाबा करा साईनाथा। चिन्मय हे सुखधामा जाउनि पहुडा एकांता।। घृ।। वैराग्याचा कुंचा घेउनि चौक झाडीला। बाबा चौक झाडीला। तयावरी सुप्रेमाचा शिडकावा दिधला।। १ ।। आता॰ घृ।। पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ति। बाबा नवविधा भक्ति।। ज्ञानाच्या समया लावुनि उजळल्या ज्योति।। आतां॰ घृ।।२ ।। भावार्थाचा मंचक हृदयाकाशी टांगिला।। बाबाकाशी टांगिला।। मनाची सुमने करूनी केले शेजेला।। ३ ।। आतां॰।। द्वैताचे कपाट लावुनि एकत्र केले। बाबा एकत्र केले।। दुर्बुद्धीच्या गाठी सोडूनि पडदे सोडीले।। ४ ।। आतां॰ घृ।। आशा तृष्णा कल्पनेचा सोडूनि गलबला। बाबा सोडूनि गलबला।। दया क्षमा शांति दासी

उभ्या सेवेला।। ५।। आतां॰ धृ।। अलक्ष्य उन्मनी घेउनी बाबा नाजुक दुःशाला। बाबा नाजुक दुःशाला।। निरंजन सद्‌गुरू स्वामी निजविले शेजेला।। आतां॰।।६।।

सद्‌गुरु साईनाथ महाराज की जय ।। श्री गुरुदेव दत्त।।

## ६ – प्रसाद मिळण्याकरिता (अभंग)

पाहे प्रसादाची वाट। द्यावे धुवोनिया ताट।।१।।
शेष घेउनी जाईन। तुमचे झालिया भोजन।।२।।
झालो आता एकसेवा। तुम्हा आळविता देवा।।३।। (x2)
तुका म्हणे आता चित्त। करुनि राहिलो निश्चित।।४।। (x2)

## ७ – प्रसाद मिळाल्यानंतर (पद)

पावला प्रसाद आता विठो निजावे। बाबा आता निजावे।
आपुला तो श्रम कळो येतसे भावे।।१।।
आता स्वामी सुखे निद्रा करा गोपाला। बाबा साई दयाळा।
पुरले मनोरथ जातो आपुलो स्थळा।।२।।
तुम्हांसी जागवू आम्ही आपुल्या चाडा। बाबा आपुल्या चाडा।
शुभाशुभ कर्मे दोष हरावया पीडा ।।३।। आता स्वामी...
तुका म्हणे दिधले उच्छिष्टाचे भोजन। उच्छिष्टाचे भोजन।
नाही निवडिले आम्हां आपुल्या भिन्न ।।४।। आता स्वामी....

श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराजकी जय।
ॐ राजाधिराज योगीराज परब्रह्म
– शेजारतीचा कार्यक्रम संपूर्ण –